गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ११३ वा ● शनिवार ०९ सप्टेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 113 | Date : 09/09/2023 | blow : Saturday | Page 4 | Price 4



# मोरोक्कोत ६.२ तीव्रतेचा भूकंप, २९६ जणांचा मृत्यू, तर शेकडो जखमी

## मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भिती

नवी दिल्ली : तुर्कस्ताननंतर आता उत्तर आफ्रिकन देश मोरोक्कोमध्ये भूकंपानं मोठ्या प्रमाणावर हाहाकार माजवला आहे. या भूकंपामुळे आतापर्यंत २९६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. भूकंपामुळे झालेला विध्वंस लक्षात घेता मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. प्रशासनानं तात्काळ बचावकार्य सुरू केलं असून ढिगाऱ्याखालून लोकांना बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बचावकार्य सुरू आहे. उत्तर आफ्रिकेतील देश मोरोक्कोमध्ये पहाटे झालेल्या । पान २ वर

**भारत सर्वोतोपरी मदत करण्यासाठी तयार : पंतप्रधान मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मोरोक्कोमधील भूकंपात प्राण गमावलेल्या लोकांच्या कुटुंबियांपैकी संवेदना व्यक्त केल्या आहेत. ते म्हणाले की, मोरोक्कोमध्ये भूकंपामुळे मोठ्या प्रमाणावर जिवीतहानी झाली आहे. हे वृत्त ऐकून अतिव दुःख झालं.

या दुखःद प्रसंगी मोरोक्कोतील ज्यांनी आपले कुटुंबिय गमावले आहेत, त्याच्याप्रति संवेदना व्यक्त केल्या आहेत. भारत या कठिण काळात मोरोक्कोला सर्वोतोपरी मदत करण्यासाठी तयार आहे.

# आजपासून जी-२० शिखर परिषद सुरू !

## जो बायडन, ऋषी सुनक यांच्यासह अनेक जागतिक नेते दिल्लीत पोहोचले




नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्ली ऋ-२० शिखर परिषदेचे यजमानपदासाठी सज्ज आहे. आज ९ आणि उद्या १० सप्टेंबर रोजी प्रगती मैदानाच्या भारत मंडपममध्ये या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्यासह अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन हे राज्य प्रमुखांच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी शुक्रवारी (८ सप्टेंबर) दिल्लीत पोहोचले आहेत. या परिषदेत जगातील अनेक देशांचे राष्ट्रप्रमुख सहभागी होणार आहेत. यानिमित्त नवी दिल्ली परिसरातही गुरुवारी रात्रीपासून अनेक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. राजधानीत होणाऱ्या जी-२० परिषदेदरम्यान सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडेकोट ठेवण्याची तयारी करण्यात आली आहे. परिषदेला उपस्थित काही परदेशी पाहुण्यांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय बैठकही घेतली. यामध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन, बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना आणि मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जगन्नाथ यांचा समावेश होता.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांचे दिल्ली विमानतळावर केंद्रीय मंत्री जनरल व्ही के सिंग यांनी स्वागत केले. यानंतर बायडन पंतप्रधान मोदींची भेट घेण्यासाठी संध्याकाळी उशिरा पंतप्रधानांच्या निवासस्थानी पोहोचले. जिथे पंतप्रधान मोदींनी त्यांचे जोरदार स्वागत केले. द्विपक्षीय चर्चेत दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या विविध मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. बैठकीनंतर पंतप्रधान मोदींनी ट्विटरवर पोस्ट केले की, राष्ट्रपती बायडन यांचे स्वागत करताना आनंद झाला. आमची बैठक अतिशय फलदायी ठरली. आम्ही अनेक विषयांवर चर्चा केली, ज्यामुळे भारत आणि अमेरिकामधील आर्थिक आणि लोकांशी संबंध वाढतील. भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील. भारत आणि अमेरिका यांच्यातील मैत्री जागतिक कल्याणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत राहील. । पान २ वर

# जरांगे-पाटील यांच्या शिष्टमंडळाची 'सह्याद्री'वर सरकारसोबत चर्चा सुरू

मुंबई : जालन्याच्या आंतरवाली सराटीत मराठा आरक्षणासाठी सुरू असणाऱ्या आंदोलनाचा तिढा सोडविण्यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. तर मनोज जरांगे-पाटील यांनीही एक पाऊल मागे घेत चर्चेसाठी शिष्टमंडळ पाठविले आहे. राज्य सरकारचे प्रतिनिधी आणि जरांगे-पाटील यांचे शिष्टमंडळ यांची सह्याद्री अतिथीगृहावर रात्री उशिरापर्यंत बैठक सुरू होती. या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखेपाटील आदी या शिष्टमंडळासोबत चर्चा करत आहेत. मराठा आरक्षणाच्या महत्त्वाच्या या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित नाहीत. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, आमदार भरत गोगावले, माजी आमदार अर्जुन खोतकर, आण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ, चंद्रकांत पाटील, उदय सामंत, दादाजी भुसे, जिल्हाधिकारी औरंगाबाद, उस्मानाबाद, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड ऑनलाइन सहभागी झाले आहेत. मुख्य सचिव मनोज सौनिक यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित आहेत. जरांगे यांच्या मागणीनुसार राज्य सरकारने मराठवाड्यातील मराठा नागरिकांसाठी । पान २ वर

# एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ

मुंबई : गणेशोत्सवाच्या आधी राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांसाठी घोषणा केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता वाढवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३४ टक्क्यांवरुन ३८ टक्के



होणार आहे. या निर्णयाचा फायदा एसटी महामंडळातील ९० हजारांहून अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. सध्या राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतनासाठी शासनाकडून अर्थसाहाय्य देण्यात येते. त्यामुळे महागाई भत्त्यामध्ये चार टक्क्यांची वाढ झाल्याने सरकारवर ९ कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. त्याचप्रमाणे असुधारित वेतन । पान २ वर



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## ✻ सुविचार ✻

समोर अंधार दिसत असला तरीही त्यापलीकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.

## संपादकीय

### त्रासाशी काही देणेघेणे नसते...

सराटी येथे मराठा समाजाच्या आंदोलकांवर बेछूट लाठीहल्ला झाल्यानंतर संतापलेल्या या समाजाने मराठवाड्यासह राज्यात आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा फटका एसटीला बसला आहे. साडेसहा हजार फेऱ्या रद्द कराव्या लागल्याने एसटीचे साडेसहा कोटींहून अधिक रुपयांचे नुकसान झाले आहे. सरकारी मालमत्ता म्हणून कोणत्याही आंदोलनात एसटीच्या गाड्यांना लक्ष्य केले जाते. एसटीतून सामान्य प्रवासी प्रवास करीत असतो. एसटी कोलमडली की त्याचा प्रवासही कोलमडतो. एसटीचे नुकसान होणार नाही याची आंदोलनाच्या नेत्यांकडून काळजी घेण्याची गरज आहे. हा एक भाग झाला. तर दुसरीकडे एसटी कशी रखडते या संधीची वाट पाहणारे खासगी ट्रॅव्हल्सवाले सर्वसामान्यांची लूट करीत असतात. मराठवाड्यात एसटी थांबल्याने या ट्रॅव्हल्सवाल्यांसाठी मराठा आंदोलन इष्टापत्ती ठरत असल्याचे समोर येत आहे. महत्त्वाच्या कामासाठी बाहेर पडणाऱ्या प्रवाशांना वेठीला धरून त्यांच्याकडून अव्वाच्या सव्वा भाडे उकळले जात आहे. हा प्रकार तेथील आरटीओ किंवा पोलिसांना अवगत नसेल अशातील भाग नाही, पण सर्वचजण हाताची घडी तोंडावर बोट या अवस्थेत असावेत. आंदोलकांची समजूत घालून निदान एसटीचा मार्ग मोकळा करून देण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. अर्थात संतप्त आंदोलकांना समजावणे कठीण असते. तरीही एसटीला लक्ष्य करून सर्वसामान्यांचे हाल होऊ देऊ नका हे कुणी तरी कळकळीने सांगितले पाहिजे. अशा या 'लूटमारी'च्या घटना वरवर साध्या वाटत असल्या तरी सर्वसामान्यांची जमाखर्चाची तोंडमिळवणी करताना किती दमछाक होत असेल याची दखल शासनाने घेतली पाहिजे. एसटीने प्रवास करणाऱ्यांना खासगी हॉटेलमध्येही नाहक मोठी पदरमोड करावी लागते. भरमसाठ भाडे आकारणी केली जात असल्याने एसटीचे कॅन्टीन कुणी चालवायला घेत नाहीत. त्याचा परिणाम बहुतांश कॅन्टीनना टाळे लागण्यात झाला आहे. यामुळे एसटीच्या बसेस खासगी हॉटेलांतून थांबविण्यात येतात. एसटी कॅन्टीनच्या तुलनेत या हॉटेलांतील खाद्यपदार्थांचे दर खिशाला परवडणारे नसतात. प्रवाशांची याबाबत वारंवारची तक्रार आहे, पण कुणाच्या तरी भल्यासाठी एसटी कॅन्टीनना लागलेले टाळे खोलण्यास वरिष्ठ अधिकारी स्वारस्य दाखवत नाहीत. लोकप्रतिनिधींना एसटीचे वावडे असल्याने त्यांना प्रवाशांना होणाऱ्या त्रासाशी काही देणेघेणे नसते.

## शासन आपल्या दारी : लोकाभिमूख उपक्रम

कल्याणकारी राज्यव्यवस्थेच्या माध्यमातून राज्यातील सर्व नागरिकांच्या आर्थिक आणि सामाजिक कल्याण व सुरक्षेला प्राधान्य दिले जाते. या अनुषंगाने शासनस्तरावर जनकल्याणाच्या अनेक योजना राबविण्यात येतात. या योजना अव्याहतपणे राबविण्यात येतात. मात्र यासाठी नागरिकांना शासकीय कार्यालयामध्ये येणे, योजनांची माहिती घेणे, योजनेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन जमा करणे, त्यातील त्रुटी दूर करणे, योजनेचा लाभ मिळवणे अशी विविध कार्ये पार पाडावी लागतात. काही वेळा नागरिकांना योजनांची माहिती नसते आणि माहितीअभावी या योजनांचा लाभ गरजू व्यक्तींपर्यत पोहोचत नाही. पर्यायाने योजनांचा उद्देश सफल होत नाही.हे टाळण्यासाठी आणि नागरिकांना मोठया प्रमाणात शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'शासन आपल्या दारी दारी' हा लोकाभिमूख उपक्रम शासनाने हाती घेतला आहे. या उपक्रमाची ही थोडक्यात माहिती.




जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या आपल्या भारत देशाने लोककल्याणकारी शासन व्यवस्था स्विकारली आहे. लोकशाहीत शासन हे जनतेला जबाबदार असते आणि त्याच दिशेने राज्यशासन कार्य करत असते. नागरिकांना केंद्रबिंदू मानून योजनांची आखणी करायची आणि शासन व्यवस्थेमार्फत त्याची अंमलबजावणी करायची अशी सर्वसाधारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. विकासाभिमूख आणि नागरिकांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना शासन राबवित असते. सर्व योजनांचा लाभ नागरिकांना एकाच छताखाली मिळावा, त्यांच्या शासकीय कार्यालयातील कमी करणे व त्यांना सहज योजनेचा लाभ मिळावा तसेच योजनांचा लाभ सुलभपणे जनतेपर्यत पोहोचविण्यासाठी शासन आपल्या दारी हा लोकाभिमूख उपक्रम महाराष्ट्रात सर्व जिल्हयात राबविण्यात येत आहे. त्यासाठी नागरिकांना विविध विभागांच्या योजनांची माहिती देणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन घेणे, प्रस्तावित लाभार्थ्यांची यादी तयार करणे व प्रत्यक्ष लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी हे या उपक्रमाचे जिल्हा प्रमुख आहेत. त्यांच्याशी इतर सर्व विभाग समन्वय ठेवतात. उपक्रमाद्वारे प्रत्येक जिल्हयामध्ये किमान पंच्याहत्तर हजार लाभार्थ्यांना एकाच छताखाली थेट लाभ देण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. जनतेला २०० हून अधिक योजनांचा लाभ देतानाच कमीतकमी कागदगपत्रे आणि लाभास जलद मंजुरी दिली जाते. शासकीय योजनांची माहिती पहिल्यांदाच 'हर घर दस्तक' च्या माध्यमातून दिली जात आहे. प्रातिनिधिक स्वरुपात लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री सचिवालयाच्या जनकल्याण कक्षामार्फत या उपक्रमाचे राज्यस्तरीय समन्वयन केले जाते. मंत्रालयस्तरावर सर्व प्रशासकीय विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधींना यामध्ये सहभागी करुन घेण्यात आले आहे. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावरील मुख्य कार्यक्रमापूर्वी तालुकास्तरावरही विविध मेळावे घेऊन नागरिकांना योजनांचा लाभ देण्यास सुरुवात झाली आहे. या उपक्रमाचा राज्यस्तरीय शुभारंभ सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील दौलत नगर (मरळी) येथे स्वत: मुख्यमंत्री यांच्या हस्ते १३ मे रोजी झाला.

महासंकल्प राज्य शासनाचा

विविध शासकीय विभागांच्या योजना, रोजगार मेळावा, महाआरोग्य शिबीर, रक्तदान व अवयवदान शिबीर, चष्मे वाटप, दिव्यांगांना साहित्य वाटप, शिक्षण हक्क कायद्यांगतर्गत २५ टक्के विद्यार्थ्यांना देण्यात येणारे प्रवेश, कृषी प्रदर्शन, महिलांना 'सखी किट' वाटप, स्वयं रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन, 'शेतकरी ते ग्राहक' थेट बाजार आणि बचतगटांचे स्टॉल, विविध सरकारी विभाग व महामंडळांच्या योजनांच्या माहितीचे स्टॉल, सामाजिक उत्तरदायित्व योजनेंतर्गत गरजूंना वैयक्तिक लाभ देणे, नवमतदार नोंदणी करणे व इतर लोकाभिमूख योजनांचा लाभ या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे.

लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू

शासकीय योजनांचा लाभ लाभार्थ्यांना सहज उपलब्ध झाल्यामुळे लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर एका प्रकारे हसू फुलले आहे. नागरिकांना लाभ देण्यापूर्वी गावपातळीवर शासन आपल्या दारी अभियानाची माहिती देऊन गावातच नागरिकांकडून लाभासाठीचे अर्ज भरुन घेण्यात येतात. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देवून त्याची पुर्तताही करुन घेण्यात येते. स्थानिकरित्या आयोजित मेळाव्याच्या ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या विविध दालनाद्वारे लाभाचे वाटप करण्यात आले. योजनेचा लाभ घेण्यासाठी एकाच ठिकाणी सर्व व्यवस्था असल्याने प्रशासनाच्या पुढाकाराबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या माणसापर्यत पोहोचवून त्याचे जीवन सुखकर करण्याचे शासनाचे ध्येय आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांचा वेळ आणि पैशाची बचत होत असून, हा उपक्रम यापुढेही सुरु ठेवावा, अशी प्रतिक्रिया लाभार्थ्यांनी व्यक्त केली आहे. आणि शासनाला धन्यवादही दिले आहेत. विविध ठिकाणी आयोजित या उपक्रमात लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून आलाच परंतु, राज्याच्या प्रमुखांबरोबर मंचावर बसण्याचा मिळालेला मानही त्यांना सुखावून गेल्याचे पुणे जिल्हयातील जेजुरी येथे पार पडलेल्या शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्यावेळी दिसून आले. हा उपक्रम सुरु झाल्यापासून शासकीय यंत्रणा सक्रिय झाली असून योजनांचा लाभ नागरिकांपर्यत पोहोचत असल्याची भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

**–जयंत कर्पे,**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, पुणे**

पान १ वरुन

### मोरोक्कोत ६.२ तीव्रतेचा भूकंप, ..

भूकंपानं मोठ्या प्रमाणावर हाहाकार माजवला आहे. मोरोक्कोमध्ये भूकंपानंतर अनेक इमारती कोसळल्या, ज्यामध्ये २९६ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. तसेच, मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भितीही व्यक्त केली जात आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, भूकंपाची तीव्रता ६.८ असल्याचं सांगण्यात येत आहे. मोरोक्को प्रशासनाकडून बचावकार्य सुरू करण्यात आलं आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू मोरोक्कोच्या माराकेश शहरापासून सुमारे ७० किलोमीटर अंतरावर होता. भूकंपाचे धक्के इतके जोरदार होते की, माराकेशपासून ३५० किलोमीटर अंतरावर असलेल्या राजधानी रबातमध्येही त्याचा प्रभाव जाणवला आहे.

भारतीय वेळेनुसार, पहाटे ३ वाजून ४१ मिनिटांनी मोरोक्कोत भूकंप झाला. युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हे (णडत्रह्ड) नं दिलेल्या माहितीनुसार, उत्तर आफ्रिकेत झालेल्या गेल्या १२० वर्षांतील हा सर्वात शक्तिशाली भूकंप आहे. णडत्रह्ड नं म्हटलं आहे की, १९०० पासून या भागातील ५०० किमी परिसरात च६ किंवा त्यापेक्षा मोठा भूकंप झालेला नाही. येथे एम-५ पातळीचे केवळ ९ भूकंप नोंदवले गेले आहेत.

माराकेशमध्ये राहणारे नागरीक ब्राहिम हिम्मी यांनी एजन्सीला सांगितलं की, भूकंपामुळे अनेक जुन्या इमारती कोसळल्या. लोकांमध्ये भितीचं वातावरण निर्माण झालं आणि लोक घाबरुन सैरावैरा पळू लागले. क्षणार्धात होत्याचं नव्हतं झालं. ते म्हणाले की, लोक घाबरले आहेत आणि पुन्हा भूकंपाच्या भीतीने घराबाहेर पडले. भूकंपाशी संबंधित अंगावर शहारे आणणारे फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून शेअर केले जात आहेत.भूकंपामुळे इमारती कोसळण्याच्या सर्वाधिक घटना माराकेशच्या जुन्या शहरात घडल्या आहेत. प्रशासनासह नागरिकांनीही कोसळलेल्या इमारतींचा मलबा हटवण्याचं काम सुरू केलं आहे. शहरातील प्रसिद्ध लाल भिंतीचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर करण्यात आले आहेत, ज्यामध्ये एका भागात मोठ्या भेगा पडल्या असून काही भाग कोसळून त्याचा ढिगारा रस्त्यावर पडलेला दिसत आहे.

### आजपासून जी-२० शिखर..

पंतप्रधान कार्यालयाने सांगितले की, दोन्ही राष्ट्राध्यशांच्या चर्चेत अनेक मुद्द्यांचा समावेश आहे, यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध आणखी घट्ट होतील. त्याच वेळी, व्हाईट हाऊसकडून सांगण्यात आले की, पंतप्रधान मोदींनी आज राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांचे भारतात स्वागत केले. भारत आणि अमेरिका यांच्यातील भागीदारीची पुष्टी केली. पंतप्रधान मोदींच्या जून २०२३ च्या वॉशिंग्टन भेटीच्या अभूतपूर्व यशाबाबत तसेच त्यांच्या प्रगतीबद्दल त्यांचे कौतुक केले.

ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक, इटलीचे पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष अल्बर्टो फर्नांडिस, कोमोरोसचे अध्यक्ष आणि आफ्रिकन युनियनचे अध्यक्ष अझाली असाउमानी, रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव, दक्षिण कोरियाचे अध्यक्ष युन सुक येओल, ऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज आणि संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान हे देखील दिल्लीत पोहोचले आणि त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. याशिवाय ओमानचे उपपंतप्रधान सय्यद फहाद बिन महमूद अल सैद, इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी, ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुला डी सिल्वा, चीनचे पंतप्रधान ली कियांग, जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा, सिंगापूरचे पंतप्रधान ली सिएन लूंग, इंडोनेशियाचे अध्यक्ष जोको विडोडोही दिल्लीत पोहोचले. तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यप एर्दोगान, कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो, दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामाफोसा, जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा, संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस, आयएमएफ प्रमुख क्रिस्टालिना जॉर्जिएवा, नेदरलँडचे पंतप्रधान मार्क रुटे हेही उपस्थित होते. शुक्रवारी दिल्लीला पोहोचले.

**पीएम मोदी १५ द्विपक्षीय बैठका घेणार** पीएम मोदी येत्या दोन दिवसांत १५ द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. या बैठकींमुळे विविध देशांसोबतच्या भारताच्या द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेण्याची, तसेच विकास सहकार्य आणखी मजबूत करण्याची संधी मिळेल, असे पंतप्रधानांनी यापूर्वी सांगितले होते. ब्रिटन, जपान, जर्मनी आणि इटलीच्या नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठकीशिवाय पंतप्रधान मोदी शनिवारी ऋ-२० सत्रात सहभागी होणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी ते फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत डिनर करणार आहेत.

**कोणत्या मुद्द्यांवर जोर दिला जाईल?** जी २० नेते ९ आणि १० सप्टेंबर रोजी दिल्लीत होणाऱ्या समूहाच्या वार्षिक शिखर परिषदेत महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांवर चर्चा करतील. सध्याचे ऋ-२० अध्यक्ष म्हणून भारत या शिखर परिषदेचे आयोजन करत आहे. ऋ-२० चे अध्यक्ष या नात्याने भारत सर्वसमावेशक वाढ, डिजिटल इनोव्हेशन, जलवायु आणि जागतिक आरोग्य यासारख्या विविध मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करत आहे.

**'या' देशांचा जी-२० मध्ये समावेश** या गटात अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, भारत, इंडोनेशिया, इटली, जपान, कोरिया प्रजासत्ताक, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, यूके, अमेरिका आणि युरोपियन युनियन (एण) यांचा समावेश आहे. यावर्षी भारताने बांगलादेश, इजिप्त, नेदरलँड, मॉरिशस, नायजेरिया, सिंगापूर, स्पेन, संयुक्त अरब अमिराती, ओमान या देशांना विशेष आमंत्रित केले आहे.

**मॉरिशसच्या पंतप्रधानांशीही द्विपक्षीय चर्चा** शुक्रवारी, पंतप्रधान मोदींनी मॉरीशियाचे पंतप्रधान प्रविंद जुगनाथ यांच्याशी द्विपक्षीय बैठकीत चर्चा केली, यावेळी ग्लोबल साउथचा आवाज पुढे नेण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या भेटीनंतर पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर लिहिले की, पंतप्रधान प्रविंद जगन्नाथ आणि माझी खूप चांगली भेट झाली. ते पुढे म्हणाले की, भारत-मॉरिशस संबंधांसाठी हे विशेष वर्ष आहे, कारण आमच्या राजनैतिक संबंधांना ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. आम्ही पायाभूत सुविधा, संस्कृती आणि इतर क्षेत्रातील सहकार्यावर चर्चा केली.

**बांगलादेशच्या पंतप्रधानांची भेट, या मुद्द्यांवर चर्चा** यानंतर पंतप्रधान मोदी यांनी बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्याशी द्विपक्षीय सहकार्यामध्ये विविधता आणण्यावर चर्चा केली. यामध्ये कनेक्टिव्हिटी आणि व्यावसायिक दुवे यासारख्या मुद्द्यांवर चर्चा केली. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्याशी फलदायी चर्चा झाल्याचे पंतप्रधान मोदींनी ट्विटरवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे. मोदी म्हणाले, गेल्या नऊ वर्षांत भारत-बांगलादेश संबंधांमध्ये झालेली प्रगती अतिशय आनंददायी आहे. आम्ही कनेक्टिव्हिटी, व्यावसायिक सहभागासह इतर मुद्द्यांवर चर्चा केली. सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये, झचज ने म्हटले आहे की, पंतप्रधान मोदींनी भारत-बांगलादेश द्विपक्षीय सहकार्यामध्ये विविधता आणण्यावर पंतप्रधान शेख हसीना यांच्याशी फलदायी संभाषण केले. कनेक्टिव्हिटी, संस्कृती, जनसंपर्क यासह अनेक क्षेत्रात संबंध मजबूत करण्यावर त्यांनी सहमती दर्शवली.

### जरांगे-पाटील यांच्या शिष्टमंडळाची

जीआर काढला आहे. पण या जीआरमध्ये जुन्या नोंदींमध्ये कुणबी वंशावळ असेल तर मराठा-कुणबी किंवा कुणबी- मराठा जात प्रमाणपत्र दिले जाईल, असे म्हटले आहे. पण जरांगे यांनी सर्वांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी मागणी केली आहे. याबाबत जरांगे यांनी दुरुस्ती सुचवली आहे. जरांगे-पाटील यांनी पाठविलेल्या शिष्टमंडळात तेरा तज्ज्ञ आणि आठ गावकऱ्यांचा समावेश आहे.

### एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई

संरचनेतील राज्य मार्ग परिवहन कर्मचाऱ्यांना २०३ टक्क्यांवरून वाढवून २१२ टक्के महागाई भत्ता देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. एसटी महामंडळाच्या अमृत महोत्सवाच्या सांगता समारंभात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे महागाई भत्ता दिला जाईल, असे आश्वासन दिले होते.

मात्र, या आश्वासनावर कार्यवाही होत नसल्याने एसटी कर्मचारी संघटनांनी नाराजी व्यक्त केली होती. महागाई भत्त्यात वाढ करण्याच्या प्रस्तावाची फाईल मंत्रालयात धूळखात पडली असल्याचा आरोप काही दिवसांपूर्वी एसटी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला होता.

शासनाच्या कर्मचाऱ्यांना जानेवारी २०२३ पासून चार टक्के वाढीव महागाई भत्ता दिला आहे. त्याचप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांनासुद्धा मिळायला हवा होता, पण तो अद्याप मिळालेला नाही.

## कितीही आला पाऊस तरी मुंबईकरांना आहे दहीहंडीची हौस : केंद्रिय राज्य मंत्री रामदास आठवले

### नृत्यांगणा गौतमी पाटील यांचा केंद्रियराज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते मुलुंड मध्ये झाला सत्कार

मुंबई : तुम्हाला जे बोलायच आहे ते बोला २०२४ च्या निवडणूकित आम्ही देऊ तुम्हाला ऐकदाच टोला अशी विरोधकांना टोला देणारी कविता सादर करुन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी मुंबईतील दहीहंडी उत्सवात धमाल उडवून दिली.चेबूर येथील पांजरा पोल येथे रिपाइं चे जिल्हा अध्यक्ष संजय डोळसे यांनी आयोजित केलेल्या दहिहंडी उत्सवात प्रमुख अतिथी म्हणून ना.रामदास आठवले बोलत होते.यावेळी खासदार राहुल शेवाळे, रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे,सुरेश बारसिंग,उपस्थीत होते.




किती ही आला पाऊस तरी मुंबईकरांना आहे दहीहंडाची हौस, नरेद्र मोदीनी फोडली विकासाची हंडी असे सागत आहे गावागावातील दादी मग सांगा कसे होतील प्रधानमंत्री राहुल गांधी कदम यांच्या नावात आहे राम मग का होणार नाही तुमचे काम अशा कविता सादर करित ना.रामदास आठवलेनी घाटकोपर मधील आमदार राम कदम यांनी आयोजित केलेल्या दहिहंडी उत्सवात उत्साह आणला.यावेळी ना.रामदास आठवले यांचे सुपुत्र कुमार जित आठवले उपस्थीत होते.मुलुंड स्वप्न नगरी येथे रिपाइं चे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अनिल भाई गांगुर्डे आणि रिपाइं च्या राष्ट्रीय उपाध्यक्ष सौ.शिलाताई अनिल गांगुर्डे यांनी आयोजित केलेल्या दहिहंडी उत्सवात सुप्रसिध्द नृत्यांगणा गौतमी पाटील यांचा नृत्याचा कार्पाम आयोजित केला होता.यावेळी नृत्यांगणा गौतमी पाटील यांचा केंद्रिय राज्य मंत्री ना.रामदास आठवले आणि त्याच्या पत्नी सौ.सिमाताई आठवले यांच्या हस्ते साडी आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी स्टेजवर गौतमी पाटील यांनी सादर केलेली नृत्यकला ना.रामदास आठवले यांनी सहकुटुंब आणि रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी पाहिली.

## शासनाचा निधी लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सहकार्याने काम करु या : खा.श्रीनिवास पाटील

सातारा : शासनाचा निधी लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सदस्य आणि अधिकाऱ्यांनी सहकार्याने काम करावे, अशा सूचना खासदार तथा दिशा समितीचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील यांनी केल्या.

जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात दिशा समितची बैठक संपन्न झाली. यावेळी आमदार शशिकांत शिंदे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी यांच्यासह समितीचे सदस्य व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.दिशा समितीपुर्वी सदस्यांनी व यंत्रणांनी अंतर्गत बैठक घ्यावी, अशा सूचना करुन श्री. पाटील म्हणाले, आपण सर्वांनी चांगले काम करुन दिशा समितीच्या माध्यमातून जिल्ह्याला विकास करुया आणि राज्यासमारे एक आदर्श उभा करुया तसेच



लोकांना काहीतरी चांगले दिल्याचा व काही लक्षात राहण्यासारखे चांगले काम केल्याचा आनंद आपण सर्वांनी घेऊया, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# समर्पित भावनेने काम करून सामाजिक प्रश्न सोडवण्यात पुढाकार घ्यावा : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील




सोलापूर/प्रतिनिधीः प्रत्येक व्यक्तीने समाजात वावरत असताना या समाजाप्रती काही देणे आहे अशी समर्पित भावना ठेवून सामाजिक प्रश्न सोडवण्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशन आयोजित शेतकरी, उत्कृष्ट अधिकारी व पदाधिकारी गौरव सोहळयात पालकमंत्री विखे पाटील बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, विजयराजे ढोबळे, सौ. शोभा पवार, मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे मंगेश चिवटे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील पुढे म्हणाले की, रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशन द्वारा होत असलेल्या शेतकरी, उत्कृष्ट अधिकारी व पदाधिकारी गौरव सोहळ्यातील सर्व मान्यवरांनी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेले असून त्यांच्या कार्यामुळे समाजाला मोठा फायदा झालेला आहे. अधिकाऱ्यांनी प्रशासकीय कामकाज करत असताना चाकोरी बाहेर जाऊन त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांना मदत करून त्यांचे प्रश्न सोडवण्यास हातभार लावलेला आहे, त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून शेती पिकाचे उत्पादन चांगले घेऊन अर्थव्यवस्थेला गती देण्याचा प्रयत्न केला आहे, अशा सर्व मान्यवरांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी पालकमंत्री श्री विखे पाटील यांच्या हस्ते शेतकरी उत्कृष्ट अधिकारी व पदाधिकारी यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये औसा विधानसभेचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या वतीने त्यांच्या पत्नी सौ. शोभा पवार यांनी सत्कार स्वीकारला. मुख्यमंत्री सहायता निधीचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर,

अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी आशिष लोकरे, जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, शेतकरी बाळासाहेब काळे, उद्योजक दत्तात्रय कोरे, संध्या खांडेकर, सीमाताई घाडगे व अन्य मान्यवरांचा सत्कार पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आला. प्रारंभी पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील रुरल फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ. सुनील गावडे यांनी प्रस्ताविक केले व या कार्यक्रमाच्या उद्देश सांगितला.

# रासपच्या वतीने पंकजा मुंडे यांचे मैंदर्गी येथे पुष्पवृष्टी करुन स्वागत




अक्कलकोट/प्रतिनिधी : राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार महादेव जानकर साहेब यांच्या मानस भगिनी भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजा ताई मुंडे यांचे शिव शक्ती परिक्रमाच्या यात्रेनिमित्त गाणगापूर दत्तात्रय यांच्या दर्शनासाठी जात असताना मैंदर्गी ता. अक्कलकोट येथे राष्ट्रीय समाज पक्षाच्या अक्कलकोट तालुक्याच्या वतीने राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनिल दादा बंडगर यांच्या नेतृत्वाखाली जेसीबीच्या सहाय्याने पुष्पवृष्टी करुन शाल,पैशाचा हार घालून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस सुरेश गुत्तेदार, माजी अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष दाजी कोळेकर, तालुका उपाध्यक्ष विलास पाटील, तालुका कार्याध्यक्ष काशिनाथ निंबाळ,युवक आघाडीचे उपाध्यक्ष संतोष शिंदे, विद्यार्थी आघाडीचे तालुकाध्यक्ष कृष्णा कोटी,उपाध्यक्ष विशाल निंबाळ, सलगर जिल्हा परिषद गट प्रमुख रेवणसिध्द शेरी, तोरणीचे माजी सरपंच विठ्ठल सुरवसे,कृष्णा निंबाळ,बिरप्पा मिरजगी, महेश झळकी,राजू पाटील देवा हिळ्ळी, गजानन हिळ्ळी यांच्या सह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने सत्कार करताना पंकजा ताई भावूक झाल्या होत्या. माझ्या भावाचे कार्यकर्ते इतक्या मोठ्या प्रमाणात सत्कार करतील याचा विचार केला नव्हता.खरच रासपचे मावळे निष्ठावान आणि प्रामाणिक आहेत याचा प्रत्यय येत आहे. रासपच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्याचे आभार मानून पुढील दौऱ्यासाठी पंकजा मुंडे रवाना झाल्या..

# महाराष्ट्र शासनाच्या निषेधार्थ नळदुर्ग येथे सखल मराठा समाजाच्या वतीने प्रचंड रास्ता रोको आंदोलन



वागदरी/एस.के.गायकवाड : मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातील आरक्षण मिळावे या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवली येथील मनोज जरांगे पाटील यांच्या ठिय्या आंदोलनात अमानुष पणे लाटीचार्ज करणाऱ्या पोलीस प्रशासनचा व सत्ताधारी शासनाच्या निषेधार्थ नळदुर्ग ता.तुळजापूर येथे सकल मराठा समाजाच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर बसस्थानका समोर प्रचंड रास्त रोको आंदोलन करण्यात आले.प्रारंभी येथील ऐतिहासिक किल्ला गेट पासून शहरातील मुख्य रस्त्यावरून,एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काचं नाही कोणाच्या बापाचं,जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देत निदर्शने मोर्चाने आंदोलनकर्ते बसस्थानका समोर राष्ट्रीय महामार्गवर रास्ता रोको करून चक्का जाम करून टाकला.याठिकाणी मोर्चाचे नेतृत्व करणारे सकल मराठा समाचे नेते अशोक भाऊ जगदाळे,कमलाकर काका चव्हाण, बलभीम मुळे गुरुजी, अमोल पाटील, अभिजित चव्हाण,महेश कदम,नाना पाटील,योगेश केदार आदींनी सरकारच्या निषेधार्थ भाषणे करून मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे असी मागणी केली.यावेळी उदयभाऊ जगदाळे, तानाजी जाधव,संतोष पुदाले,सरदारसिंग ठाकूर, क्रष्णात मोरे,राजेंद्र गरड,मेजर राजेंद्र जाधव, शरद बागल,पद्माकर पिटील सह वागदरी,येडोळा,शहापूर, जळकोट, दहिटणा,गुळहळ्ळी सिंदगाव, सलगरा, बोरगाव, गुजनूर, लोहगाव, चिकुंद्रा व परिसरातील कार्यकर्ते हजारोच्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते.

# कार्यकर्त्यांनी आगामी निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी करावे : विक्रम शेलार



अक्कलकोट/प्रतिनिधी : रिपब्लिकन पक्ष (आठवले गट)च्या कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याच्या आव्हान रिपाइं पुणे जिल्हाध्यक्ष विक्रम शेलार यांनी केली आहे.

इंदापूर तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले गट)आज गुरुवार दिनांक ७ सप्टें रोजी इंदापूर शासकीय विश्राम गृह येथे बैठकीचे आयोजन*विक्रमभाऊ शेलार* यांच्या अध्यक्षते खाली करण्यात आली होती.या बैठकीत पुणे जिल्हा अध्यक्ष विक्रम शेलार,कार्याध्यक्ष शिवाजीराव मखरे,जिल्हा सरचिटणीस संदीपान कडवळे,तालुका अध्यक्ष बाळासाहेब सरवदे,ता सरचिटणीस राकेश कांबळे यांची मार्गदर्शनपर भाषणे केली.प्रथम जिल्हा अध्यक्ष विक्रमभाऊ शेलार यांनी बोलतांना शिर्डी अधिवेशन आणि सातारा येथील कार्यकर्ता अभ्यास शिबीर यरास्वी केल्याबद्दल तालुका व जिल्हा पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. आगामी पंचायत समिती,जिल्हा परिषद,नगर परिषद निवडणूक संदर्भात मित्र पक्षांनी जर युतीचे नियम पाळून विश्वासात घेतले नाही तर आरपीआय ने सर्व जागेवर स्वतंत्र उमेदवार उभे करणार असल्याचे सांगितले. ही बैठक यशस्वी करण्यासाठी इंदापूर शहर अध्यक्ष अमोल मिसाळ,तालुका मुख्य सरचिटणीस राकेश कांबळे,सरचिटणीस महेंद्र भोसले,कार्याध्यक्ष अमोल कांबळे,कार्याध्यक्ष नितीन झेंडे,उपाध्यक्ष समाधान भोसले,दादा पिसे,इंदापूर तालुका महिला आघाडी अध्यक्षा नंदाताई सोरटे यांनी विशेष परिश्रम घेतले.शेवटी आभार महेंद्र भोसले यांनी मानले सदर बैठक उत्साह पूर्ण वातावरणात पार पडली.

# शिवसेना अध्यात्मिक सेना जिल्हाप्रमुख पदी ह.भ.प.रसाळ यांची नियुक्ती



निफाड/प्रतिनिधीः निफाड तालुक्यातील आहेरगाव येथील ह भ प भास्कर महाराज रसाळ यांची शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेच्या नाशिक जिल्हा प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर स्व. आनंदजी दिघे साहेब यांची शिकवण यांचा सक्रिय पणे प्रचार व प्रसार करण्यासाठी व पक्ष वाढीसाठी कार्य करण्यासाठी शिवसेना मुख्य नेते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेशाने शिवसेना सचिव संजय मोरे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांचे मार्गदर्शना खाली शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना नाशिक जिल्हाप्रमुख ह भ प भास्कर महाराज रसाळ आहेरगावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे आध्यात्मिक सेना जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दादा भुसे, शिवसेना नेते भाऊसाहेब चौधरी, खासदार हेमंत गोडसे, संपर्कप्रमुख जयंत साठे, सुनील पाटील, सह संपर्कप्रमुख राजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, जिल्हाप्रमुख ढिकले, जिल्हाप्रमुख बहुलाल तांबडे, निफाड तालुकाप्रमुख अनिल पा. कुंदे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# रिपाईच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पदी शशिकला वाघमारे यांची निवड

पंढरपूर/प्रतिनिधी : रिपाईच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पदी शशिकला वाघमारे मा रामदास आठवले यांनी पत्र दिले महिलांची संघटना वाढवून अशोक बानगुडे पुणे पश्चिम महाराष्ट्रा मध्ये महिलांना न्याय देण्यासाठी प्राधान्यक्रम असणार आहे तसेच महिलांचे संघटन करीत पक्षाची ताकद वाढवणार असल्याचे स्पष्ट विचार नवनिर्वाचित पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा शशिकाला वाघमारे यांनी मांडले स्व हौसाबाई बंडू आठवले वृद्धाश्रमाचे अध्यक्ष शशिकला वाघमारे यांची केंद्रीय सामाजिक राज्यमंत्री ना रामदासजी आठवले यांच्या आदेशावरून पश्चिम महाराष्ट्राच्या रिपाई महिला अध्यक्षपदी निवड करण्यात असल्याचे पत्र प्रदेशाध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे यांनी दिले



यावेळी प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे प्रदेश सरचिटणीस गौतम सोनवणे प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष अशोक गायकवाड प्रदेश सचिव बाबुराव वाडेकर बाळासाहेब जानराव उपाध्यक्ष संगीता आठवले यांनी त्यांच्या निवडीचे स्वागत केले दरम्यान केंद्रीय मंत्री रामदास आठवले साहेबांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सीमा आठवले यांनी दूरध्वनीवरून अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# दुधनी रिपाइं कडून पंकजाताई मुंडे यांच्या सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः भाजपाचे देशाचे माजी मंत्री स्वर्गीय गोपीनाथ जी मुंडे यांच्या कन्या महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या दुधनी रिपाइं (आठवले गट)च्या वतिने जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आली आहे. पंकजा मुंडे यांच्या सध्या महाराष्ट्र भर दौरा सुरु आहे. त्या अनुषंगाने आज दुधनी गावावरुन जात असतांना रिपाइं आठवले गट च्या वतीने गौरव करण्यात आली.



दुधनी येथील डां.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथील रुपाभवानी मंदीर जवळ पंकजा मुंडेंना थांबवून सत्कार करण्यात आली आहे.याप्रसंगी रिपाइं जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी,ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे,शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,मु.आ.शहर अध्यक्ष महेदिमिंया जिडगे, शशिकांत भोसले,रामा बसवनकेरी,राघवेंद्र बसवनकेरी, खाजु लोड्डे,रमेश धोडमनी,विजयकुमार धोडमनी आदि उपस्थित होते.

# सहकारी संस्था बळकटीकरणावर अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे

## सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांचे प्रतिपादन

पुणे/विशेष प्रतिनीधी : सहकारी संस्था ग्रामीण आर्थिक विकासाचा पाया आहेत आणि युवकांना रोजगार देण्याचे सहकार हे उत्तम माध्यम असल्याने अधिकाऱ्यांनी सहकारी संस्थांच्या बळकटीकरणावर भर द्यावा, असे आवाहन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.

हॉटेल आर्किड येथे आयोजित राज्यस्तरीय सहकारी अधिकारी परिषदेत ते बोलत होते. कार्यक्रमाला सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे, साखर आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे कार्यकारी संचालक दिपक तावरे आदी उपस्थित होते.सहकारमंत्री श्री. वळसे पाटील म्हणाले,भारत सरकारकडून सहकार कायद्यात सुधारणा करण्यात येणार असून नवीन कायद्यानुसार अनेक प्रकारचे उपक्रम राबविण्यास परवानगी दिली जाणार आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या वाढणार आहेत. अधिकाऱ्यांनी गावपातळीवर जाऊन सर्वसामान्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. शासनाच्या योजना विविध माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवाव्यात. सहकार क्षेत्रात सकारात्मक बदल घडविण्यासाठी अधिकाऱ्यांबरोबरच संचालक मंडळ, सचिव यांनाही प्रशिक्षण द्यावे, असे सांगितले.

सहकार मंत्री म्हणाले, सहकाराच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, आर्थिक प्रगती होऊ शकते. अधिकाऱ्यांनी रचनात्मक काम करुन सामान्य सभासदांचा विश्वास संपादन करावा. तक्रारींचा निपटारा कालमर्यादेत करावा, विशेषतः आदिवासी, डोंगराळ भागातील सोसायट्याना चांगल्या सेवा न मिळाल्याने अडचणीत जातात. जिल्हा बँकांकडून कर्ज वाटप न झाल्यामुळे कुटुंब अडचणीत येतात. बेकायदेशीर सावकारी मोडून काढण्यासाठी कायदा केला आहे, त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे श्री वळसे-पाटील यांनी सांगितले.




'सहकार विभागाच्या भविष्यातील वाटचाल' याविषयी बोलताना राजेश कुमार म्हणाले, सहकार मंत्रालयाच्या निर्देशानुसार सर्व अधिकाऱ्यांनी काम करावे. सहकारी संस्थाच्या सक्षमीकरणासाठी योजना तयार करावी. सहकार क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन द्यावे आणि त्याविषयी संस्थांना मार्गदर्शन करावे. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाचे संगणकीकरण करावे. 'सहकार संवाद' युट्युब वाहिनीद्वारे विविध विषयांची माहिती प्रसारित करावी, बचत गटांना पॅक्समार्फत मार्केटिंगची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

पणन, सहकार व महाराष्ट्र सहकारी विकास महामंडळाने समन्वयाने काम करावे असे सांगून ते म्हणाले, भविष्यातील वाटचालीसाठी सहकार क्षेत्रात ग्रामस्तरापासून राज्यस्तरापर्यंत संस्थांना प्रशिक्षण व संस्था बांधणी, राज्य सहकारी संसाधन संस्था निर्मिती, ऑनलाईन प्रशिक्षण, कार्यशाळा घेणे असे उपक्रम घेण्यात येणार आहेत. प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाद्वारे आदर्श प्राथमिक कृषी पतसंस्था उभारण्याचा प्रयत्न करावा. सहकार क्षेत्राला चालना देण्यासाठी सहकार विकास व संशोधन प्रबोधिनी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात श्री.कवडे म्हणाले, राज्याच्या सहकार विभागाला असलेली १०० वर्षाची गौरवशाली परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी सहकार विभागावर आहे. त्यादृष्टीने सहकार विभागाच्या कामकाजाचे आदानप्रदान व्हावे, जनतेच्या अपेक्षा लक्षात घेऊन नव्या कल्पना पुढे याव्यात यासाठी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र सरकारने सहकाराशी संबंधित क्षेत्राबाबत घेतलेल्या निर्णयांची माहिती परिषदेच्या माध्यमातून होईल. सहकार क्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी ही परिषद उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अधिकाऱ्यांनी क्षेत्र भेटी वाढवून सहकारी संस्थांना भेटी द्याव्यात आणि सहकारी संस्थांच्या बळकटीकरणासाठी सहकार्य करावे, त्यासाठी आवश्यक उपक्रम राबवावेत, असे आवाहन त्यांनी केले. केंद्र सरकारने सुरू केलेल्या उपक्रमांबाबत सादरीकरण केले. महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे यांनी महामंडळाच्या विविध उपक्रमांबाबत सदारीकरणाद्वारे माहिती दिली. साखर आयुक्तालयाचे संचालक डॉ.संजयकुमार भोसले यांनी आयुक्तालयाच्या कामकाजाविषयी सादरीकरण केले.अपर निबंधक संतोष पाटील यांनी आदर्श प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था निर्माण करण्यासाठीच्या उपाययोजना सांगितल्या.

यावेळी जिल्हा उपनिबंधक पुणे, चंद्रपूर, अहमदनगर, सांगली, सिंधुदुर्ग व बीड यांनी जिल्ह्यात राबविलेल्या उपक्रमांची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था संजय राऊत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सहकारी संस्थांसाठी तयार केलेल्या मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशनही सहकार मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळाच्या दोन उत्पादनांचा शुभारंभही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.परिषदेला राज्यातील अपर निबंधक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक उपस्थित होते.

# बाऽऽ.. विठ्ठला राज्यावरील दुष्काळाचे संकट दूर कर : डॉ.नीलम गोऱ्हे



पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते पंढरपूर येथे श्री. विठ्ठल मंदिराच्या गाभाऱ्यात आज पहाटे नित्यपूजा करण्यात आली. याप्रसंगी त्यांच्या सोबत त्यांच्या भगिनी आणि स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त श्रीमती जेहलम जोशी उपस्थित होत्या. श्री. विठ्ठलाच्या पूजेवेळी श्रीमती. अनुसया फसळकर यांनी म्हटलेला काकडा डॉ. गोऱ्हे यांना प्रचंड भावला. शक्य असल्यास मंदिर प्रशासनाने या काकड्याचे शब्दांकन करावे असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. तसेच घरामध्ये पिढ्यानपिढ्या श्रावण महिन्यात पंढरपूरच्या श्री. विठ्ठलाची पूजा करण्याची प्रथा सुरू आहे त्यानिमित्ताने आज विठ्ठलाची सेवा करण्याचा लाभ मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात दुष्काळाची छाया गडद होत चालली आहे. हे संकट दूर व्हावे आणि पाऊस पडावा म्हणून विठ्ठलाकडे प्रार्थना केली असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.याप्रसंगी, श्री. विठ्ठल मंदिर प्रशासनाच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र शेळके यांनी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा विठ्ठलरुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार केला. यावेळी विठ्ठल मंदिरातील नित्योपचार विभाग प्रमुख श्री. संजय कोकीळ आणि इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# बांधकाम व्यावसायिकांनी असंघटीत कामगारांची नोंदणी करण्यासाठी पुढाकार घ्यावा : उद्योगमंत्री उदय सामंत




पुणे : असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी शासनाच्यावतीने विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. शासकीय योजनांचा कामगारांना लाभ मिळावा यासाठी मराठी बांधकाम व्यावसायिक संघटनेने पुढाकार घ्यावा असे आवाहन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले.

मराठी बांधकाम व्यावसायिक संघटनेच्यावतीने 'पुणे शहर व परिसरात होणाऱ्या संभाव्य औद्योगिक विकास व पायाभूत सुविधांचा बांधकाम क्षेत्रावर होणारा परिणाम' या विषयावर आयोजित केलेल्या चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, मराठी बांधकाम व्यावसायिक संघटनेचे एस.आर.कुलकर्णी, नंदू घाटे, प्रमोद पाटील, अंकुश आसबे आदी उपस्थित होते.

उद्योग मंत्री श्री.सामंत म्हणाले, बांधकाम क्षेत्रामुळे रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या आहेत. बांधकाम व्यावसायिक सर्वसामान्यांना घरे उपलब्ध करुन देतात. बांधकाम क्षेत्रातील असंघटीत कामगारांनाही घरे उपलब्ध करुन देण्यासाठी संघटनेने पुढाकार घ्यावा. संघटनेने त्यांच्या क्षेत्रातील कामगारांची, महिला कामगारांची नोंदणी करावी. त्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा फायदा मिळेल. मराठी माणसाने मराठी माणसाला व्यवसायामध्ये सहकार्य करावे अशी अपेक्षा श्री.सामंत यांनी व्यक्त केली. बांधकाम क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.खासदार श्रीरंग बारणे यांनी पुणे परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे होत असून याचा लाभ बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांना होणार असल्याचे सांगितले.संघटनेचे अध्यक्ष नंदू घाटे यांनी प्रास्ताविकात संघटनेच्या कार्याची माहिती दिली.



# नाशिक विभागीय अधिस्वीकृती समिती अध्यक्षपदी सुधीर लंके यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वतीने सत्कार

अहमदनगर : संगमनेर अकोले तालुक्याचे भुमिपुत्र जेष्ठ पत्रकार सुधीरजी लंके यांची निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने नगर येथे दैनिक लोकमत कार्यालयात व संघाची पुस्तिका देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस दैनिक समर्थ गावकरी चे समूह संपादक डॉ विश्वासराव आरोटे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे फुलसुंदर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पारनेर तालुका अध्यक्ष विनोद गायकवाड आदी उपस्थित होते

# पडघा येथील शिवसेना(उबाठा)गट आयोजित मानाच्या दहीहंडीला उस्फूर्त प्रतिसाद



भिवंडी/मिलिंद जाधव :भिवंडी तालुक्यातील पडघा येथील शिवसेना (उबाठा) गट आयोजित मानाच्या दहीहंडीला गोंवीद पथकांचा उस्फूर्त प्रतीसाद लाभला. शिवसेना (उबाठा) गट उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर व पडघा शहरप्रमुख संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मानाच्या दहीहंडीचे आयोजन बस स्थानका शेजारील मैदानात करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील विविध गोंविदा पथकांनी हजेरी लाऊन चित्त थरारक मानवी मनोरे रचत सलामी दिली.यावेळी शिवसेना संपर्क प्रमुख व माजी आमदार रुपेश दादा म्हात्रे,ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे उपजिल्हाप्रमुख तुळशीराम पाटील, इरफान भुरे महीला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा ज्योतीताई ठाकरे तालुकाप्रमुख कुंदन पाटील युवा सेना उपजिल्हा अधिकारी राजुभाऊ चौधरी तालुका युवा अधिकारी पंकज घरत उपतालुकाप्रमुख निवृत्ती मगर महीला तालुका प्रमुख फशीताई पाटील उपसरपंच गिरीश जाधव ग्रामपंचायत सदस्या नैना जाधव उद्योगपती दिनेश भोईर, प्रदीप भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मानाची दहीहंडी फोडण्याचा मान ओम साई प्रतिष्ठान पडघा या गोंविदा पथकास मिळाला. तर ३० हजार रुपये दहीहंडी बक्षीस रक्कम व आकर्षक चषक पडघा, खोणी, चौधरपाडा या गोंविदा पथकास विभागुन देण्यात आली. तर यावेळी जय हनुमान गोंविदा पथक खाणी यांनी सात थर रचुन उपस्थितांची मने जिंकली हा दहीहंडी उत्सव यशस्वी करण्यासाठी संजय पटेल, रवि भोईर, अशोक गायकवाड, रुपेश कुडुसकर, संतोष बोंडकर, सुनील गंधे, प्रतिक गंधे, संजय वांळज, राजेंद्र वांळज, नरेश गायकवाड, सुरेश चंदे, अतुल भोईर यांनी मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र पाटील व गणेश गायकवाड यांनी केले.

# राष्ट्रीय पोषण महा आणि गरोदर मातेचा सन्मान सोहळा



अक्कलकोट/प्रतिनिधीः हन्नुर एकात्मिक महिला बालकल्याण व अंगणवाडी विभाग ग्रामपंचायत हन्नुर, सागर दादा कल्याणशेट्टी मित्रपरिवार, यांच्या संयुक्त विद्यमाने , राष्ट्रीय पोषण महा. अभियानांतर्गत गरोदर मातेचा सन्मान सोळा मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्थेच्या संचालिका सौ शांभवी ताई कल्याणशेट्टी, यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या व मार्गदर्शक, प्रसुती तज्ञ , डॉ. सुप्रिया , संगोळगी, यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले.परसोतेच्या महिलांनी आरोग्याचे काळजी घ्यावी, औषधोपचार अत्यंत व्यवस्थितरीत्या करावे, जेवण वेळेवरती करावं,

महिलाने अत्यंत महत्त्वपूर्ण जबाबदारी आपल्या होणाऱ्या बालकाचे संगोपन करावे.असे आव्हान डॉ संगोळगी मॅडम यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा , सौ शांभवी कल्याणशेट्टी यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, होणाऱ्या बालकाचे काळजीपूर्वक औषध उपचार करावे स्वतःचा औषध उपचार करावा.एक चूक महागात पडू शकते.त्यासाठी महिलांनी आपली स्वतः सह बालकाची जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडावी असे , आव्हान केले. यावेळी व्यासपीठावरती, श्रीमती सुरेखा काकू कल्याणशेट्टी, माजी जिल्हा परिषद सदस्य मंगल ताई कल्याणशेट्टी, सौ स्वरूपा काकु कल्याणशेट्टी, एकात्मिक महिला बालकल्यांच्या पर्यवेक्षिका, सौ अश्विनी चटमुटगे, उपस्थित होत्या.यावेळी, ५ महिलांचे डोहाळे जेवणाचा कार्यक्रम करण्यात आला.३० महिलांचा ओटी भरण्याचा कार्यक्रम करण्यात आला.फुल आहेर,हार,गुच्च ओटी भरण्याचे साहित्य देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी हन्नुर चे सरपंच सौ सोनली तळवार,उपसरपंच सागर दादा कल्याणशेट्टी, ग्राम पंचायत सदस्य पत्रकार गौतम बाळशंकर, ग्राम पंचायत सदस्या जयाबाई भरमशेट्टी अर्जुन जळकोटे अनिल तळवार, शरण बंदीछोडे, प्रवीण कोरे, आदी उपस्थित होते.अंगणवाडी सेविका अर्चना पत्की,नया बाळशंकर आशा इरवाडकर अंगणवाडी सेविका ज्योती बाळशंकर, मायाव्वा घोडके, ज्योती कोरे, सौ स्वप्नाली जामदंडे मॅडम, सौ माळी मॅडम सौ संध्याराणी ओमन मॅडम, फिरदोस सय्यद मॅडम, सौ म्रदुलादेवी हिरेमठ मॅडम, कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंगणवाडी सेविका सौ ज्योती बाळशंकर, सुत्रसंचालन सौ कल्पना स्वामी मॅडम, तर अभार सौ माळी मॅडम यांनी केले.

